


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २५७, शनिवार २९ जुन २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# दूध आंदोलनाची ठिणगी पडली!

## टाकळीहाजी येथे पारनेर व शिरूर तालुक्यातील शेतकरी रस्त्यावर






■ टाकळीहाजी येथे दूध उत्पादकांनी रस्ता रोको आंदोलन करीत सरकारचे लक्ष वेधले. ■ मुंबईत विधानभवनाबाहेर शेतकऱ्यांनी रस्त्यावर दूध ओतून सरकारच्या धोरणाचा निषेध केला.

गाडीलगांव : प्रतिनिधी

**दूध दरामध्ये मोठया प्रमाणावर घसरण झाल्यामुळे दूधउत्पादकांमध्ये असलेल्या असंतोषाला शुक्रवारी तोंड फुटले. टाकळीहाजी येथे पारनेर व शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी एकत्र येत रस्ता रोको आंदोलन करीत सरकारविरोधी घोषणाबाजी केली. सत्ताधाऱ्यांना लोकसभेप्रमाणेच विधानसभा निवडणूकीतही धडा शिकवा असे आवाहन यावेळी करण्यात आले.**

सरकारने दूधाला किमान ४० रूपयांचा हमीभाव द्यावा, पशुखाद्याचे दर कमी करावेत, जानेवारीमध्ये घोषीत केलेले दूधाचे अनुदान दूध उत्पादकांच्या खात्यावर लवकरात लवकर जमा करावे अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या. दहा ते बारा दूध उत्पादक शेतकऱ्यांनी यावेळी अतिशय आक्रमक भाषणे करीत प्रशासनाचे लक्ष वेधले. दूधाला कवडीमोल भाव मिळत असताना दुसरीकडे पशुखाद्याचे दर गगणाला भिडल्याने शेतकरी आर्थिक मेताकुटीला आला आहे. शेतकरी सरकारकडे वारंवार मागणी करूनही शेतकऱ्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष करीत आहे. शेतमालास भाव नाही. नगदी पिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कांद्याला भाव नाही. केंद्र सरकारने कांद्यावर निर्यात बंदी लादल्याने परदेशामध्ये कांद्याला चांगला भाव असतानाही निर्यात करता येत नाही. शेतीचा जोडधंदा असलेल्या दूधालाही भाव नसल्याने या सरकारचे काय करायचे असा सवाल यावेळी करण्यात आला.

या आंदोलनात युवा सेनेचे तालुकाध्यक्ष तथा शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे, दिलीप सोदक, सोमाशेठ भाकरे, सरपंच दामू अण्णा घोडे, बन्सीनाना घोडे, रूपेश ढवण, महेंद्र पांढरकर यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

### गायीच्या किमतीही उतरल्या

गेल्या आठ महिन्यांपासून दूधाचे दर कोसळले आहेत. त्यावेळी ज्या गाय सव्वा लाख रूपये किंमत होती, त्याच गाईची किंमत आज ५० ते ६० हजार रूपयांपर्यंत खाली आली आहे. एकीकडे दूधाचे दर कोसळलेले असताना दुसरीकडे गायांची किंमतही कमी झाल्याने त्यातून होणारा तोटाही शेतकरी वर्गाचाच असल्याच्या भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

### अनुदान कधी देणार ?

दर कोसळल्यानंतर शासनाने अनुदानाची घोषणा केली. हे अनुदान ठराविक शेतकऱ्यांना मिळाले मात्र ते देखील पुर्णपणे मिळाले नाही. मोठया प्रमाणावर शेतकरी या अनुदानापासून आजही वंचित आहेत. केवळ घोषणा करणारे सरकार शेतकऱ्यांना कधी अनुदान देणार असा सवाल यावेळी करण्यात आला.

### लोकसभा निवडणूकीप्रमाणे विधानसभेलाही धडा शिकवा

शेतकऱ्यांकडून वारंवार मागणी होत असतानाही राज्यातील सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे मतदारांनी लोकसभा निवडणूकीत त्यांना धडा शिकविला तसाच धडा आगामी विधानसभा निवडणूकीतही शिकवण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

### लक्षवेधी फलक

दूध आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या बापाचं, लढू न्याय्य हक्कासाठी जिंकू शेतकरी राजासाठी, नको आम्हाला फुकटचं मोल द्या कष्टाचं अशा घोषणांचे फलक घेऊन शेतकरी या आंदोलनात सहभागी झाले होते. हे फलक उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होते.

### विधानभवनाबाहेर शेतकऱ्यांचे आंदोलन

दूध दरवाढीच्या मागणीसाठी संतप्त शेतकऱ्यांनी विधानभवनामध्ये अर्थमंत्री अर्थसंकल्प सादर करीत असताना दूध ओतून आंदोलन केले. पोलीसांनी आंदोलकांना थांबविण्याचा प्रयत्न केला मात्र शेतकरी आक्रमकपणे घोषणाबाजी करीत सरकारच्या निषेधाच्या घोषणा देत होते.

### सरकार शेतकऱ्याचा कधी विचार करणार ?

दूधाला २५ रूपये भाव मिळतो, त्यासाठी खर्चही २५ रूपये येतो. गोठयामध्ये काम करणारे कामगार, स्वतःचे कष्ट याचा विचार केला तर शेतकरी आज मोठया संकटात आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या प्रश्नाचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे.

# इंग्रजी शपथविधीसाठी शुभेच्छाही इंग्रजीतूनच!

## ■ अर्जुन भालेकरांच्या फलकाने वेधले लक्ष ■ इंग्रजीचे कवित्व संपेना

पारनेर : प्रतिनिधी

**आय नीलेश ज्ञानदेव लंके, डोन्ट अंडरईस्टीमेट द पॉवर ऑफ कॉमन मॅन ! बेस्ट विशेस फ्रॉम अर्जुन जयवंत भालेकर,एम एस्सी, व्हाईस प्रसिडेंट एनसीपी, अहमदनगर अशा आशयाचा फलक खा. नीलेश लंके यांच्या कार्यालयाबाहेर झळकला असून तो येणाऱ्या जाणारांचे लक्ष वेधून घेत आहे. खा. लंके यांनी संसदेत इंग्रजीमधून शपथ घेतल्यानंतरही इंग्रजीचे कवित्व संपण्यास तयार नसून अर्जुन भालेकर यांनी इंग्रजीमधून दिलेल्या शुभेच्छांची तालुक्यात चांगलीच चर्चा झडत आहे.**

यासंदर्भात अर्जुन भालेकर यांच्याशी संवाद साधला असता ते म्हणाले, लोकसभा निवडणूकीच्या काळात महाविकास आघाडीचे उमेदवार, आमचे नेते नीलेश लंके यांना इंग्रजीतून भाषण करून दाखवा असे आव्हान देत हिणवण्यात आले होते. लंके यांनी मात्र त्यास इंग्रजी बोलणारा खासदार हवा की तुमचे प्रश्न मांडणारा खासदार हवा असा प्रतिप्रश्न करीत प्रत्युत्तर दिले होते. या निवडणूकीत इंग्रजीचा मुद्दा चांगलाच गाजला. विरोधी भाजपा उमेदवार डॉ. सुजय विखे यांचा पराभव करून खा. नीलेश लंके हे संसदेत पोहचले. मंगळवारी त्यांनी इंग्रजीत शपथ घेत सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला.

भालेकर म्हणाले, खा. नीलेश लंके यांनी आयटीआयचा फीटर कोर्स केलेला असला तरी त्यांनी पुढे कला शाखेतून पदवीही घेतलेली आहे. असे असताना ते सामान्य माणसाला, शेतकरी बांधवाला भावेल अशाच भाषेत संवाद साधतात. याचा अर्थ त्यांना इंग्रजी बोलताच येणार नाही असा काढणे साफ चुकीचे होते. अर्थात खा. लंके यांनी प्रचारादरम्यान मी इंग्रजी बोलेन किंवा बोलणार नाही यावर भाष्य केले नव्हते. निकालानंतर मात्र त्यांनी संसदेत मी इंग्रजी बोलणार असे स्पष्ट केले होते. त्याप्रमाणे त्यांनी इंग्रजीत शपथ घेतली. त्याचा आम्हाला अभिमान असून म्हणूनच आपण हा फलक लावला असल्याचे भालेकर यांनी स्पष्ट केले.




■ नीलेश लंके यांनी संसदेमध्ये इंग्रजीतून शपथ घेतल्यानंतर त्यांना इंग्रजीतून शुभेच्छा देणारा फलक अर्जुन भालेकर यांनी खा. लंके यांच्या पारनेर येथील संपर्क कार्यालयाबाहेर लावला आहे. (छाया : अनिल चौधरी)

### खा. लंके कर्तृत्व सिद्ध करणार

सन २०१९ मध्ये विधानसभेमध्ये गेल्यानंतर नीलेश लंके यांना विधीमंडळाच्या कामकाजाचा कोणताही अनुभव नव्हता. मात्र त्यांनी कामकाजाची माहीती घेऊन मतदारसंघात १ हजार ५०० कोटी रूपयांपेक्षाही अधिक निधी खेचून आणला जे एक रेकॉर्ड आहे. संसदेत त्यांनी आताशी पाऊल टाकले आहे. विधासभेप्रमाणेच ते संसदेतही आपल्या कामचा ठसा उमटवून आपले कर्तृत्व सिद्ध करतील.

**अर्जुन भालेकर**
उपाध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस

# अर्थसंकल्पात घोषणांचा पाऊस ! ३ सिलेंडर मोफत, महिन्याला १५०० रुपये; अजित पवारांच्या बजेटमधील टॉप १० घोषणा

मुंबई : प्रतिनिधी

**राज्याच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्याच दिवशी राज्य सरकारने अर्थसंकल्प सादर केला असून विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोठ्या घोषणा यंदाच्या बजेटमध्ये करण्यात आल्या आहेत. महिला वर्गांना खुश करण्याचा प्रयत्न या बजेटमधून करण्यात आला असून गेल्या २ दिवसांपासून चर्चा होत असलेल्या लाडकी बहिण योजनेची घोषणाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर करताना केली. यासह अर्थसंकल्पात अन्या महत्त्वाच्या घोषणा देखील करण्यात आल्या.**

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना**

राज्यात लेक लाडकी योजनेसह महिलांना आर्थिकदृष्ट्या मदत करण्यात येत असून नव्या योजनेची सुरुवात करण्यात आली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू होत असून बजेटमध्ये महिलांसाठी विविध योजना सुरू होणार असल्याची घोषणा करण्यात आली. या योजनेंतर्गत राज्यातील २१ ते ६० वर्षांतील महिलांना दरमहा १५०० रुपये देणार.



**वारीच्या प्रतिदिंडीस २० हजार रुपयांचा निधी**

संत श्री तुकाराम महाराजांचं नाव घेत अजित पवारांनी अर्थसंकल्पाची सुरुवात केली. मुख्यमंत्री वारकरी संप्रदाय महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती अजित पवार यांनी यावेळी दिली. तसेच, वारीसाठी पंढरीकडे प्रस्थान करणाऱ्या नोंदणीकृत दिंड्यांना, प्रतिदिंडी २० हजार रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. तसेच, वारीचा प्रस्ताव युनेस्कोकडे पाठवण्यात येणार असल्याचेही घोषित केले.

शेतकऱ्यांना प्रती हेक्टर ५ हजार रुपयांचं सहाय्य, वीज बिल माफ राज्यातील ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर असल्याचे सांगत ई पंचनामा प्रणाली संपूर्ण राज्यात लागू केली आहे. शेतकऱ्यांना १ रुपयांत पिक विमा देण्याची योजना कायम असणार आहे. तर, गाव तिथे गोदाम योजना राबवण्यात येत आहे. जुन्या गोदामांची डागडुजी करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. तसेच राज्यातील कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रतीहेक्टर ५ हजार रुपयांचं अर्थसहाय्य मिळणार आहे. राज्यातील शेती कृषी पंपाचे सर्व थकित बील माफ करण्यात आल्याचेही अजित पवारांनी सांगितले.

**मुलींना शिक्षणशुल्क आणि परीक्षा शुल्क माफ**

राज्यातील व्यावसायिक शिक्षणात मुलींची संख्या वाढवण्यासाठी सरकार कटिबद्ध असून अभियांत्रिकी, वास्तूशास्त्र, वैद्यकीय तसंच कृषीविषयक अभ्यासाठी प्रवेशीत ८ लाखांपर्यंत उत्पन्न असलेल्या इतर मागासवर्ग आणि आर्थिकदृष्ट्या उर्वरीत पान ३ वर

# वाळू धोरणामध्ये अधिक सुलभता आणण्यासाठी शासन कटिबद्ध

## महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची ग्वाही

मुंबई : प्रतिनिधी



**सर्व सामान्यांना परवडेल अशा दरात वाळू उपलब्ध होण्यासाठी सरकारने धोरण घेतले आहे. या धोरणामध्ये अधिक सुलभता कशी येईल हाच सरकारचा प्रयत्न असून, या धोरणातील बदला बाबत काही सुचना आल्यास त्यांचा स्विकार सरकार करेल अशी ग्वाही महसूल मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.** पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी उपस्थित करण्यात आलेल्या वाळू प्रश्नांवर बोलताना महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, गेली अनेक वर्षे या वाळू व्यवसायावर माफीयांचा प्रभाव होता. या व्यवसायातून गुन्हेगारीकरणही वाढले. सर्वसामान्य माणसाला होणारा त्रास कमी व्हावा म्हणूनच या सभागृहात चर्चा करुन, सर्वकश असे वाळू धोरण सरकारने आणून त्याची अंमलबजावणी सुरु केली. या धोरणाबाबत अजूनही सर्वांशी संवाद उर्वरीत पान ३ वर









फॅशन | संसार | सौंदर्य
सखी

# ...तर गृहिणीही दिसतील स्टायलिश!

**गृहिणीला घराची काळजी घेता घेता स्वतःकडे लक्ष द्यायलाही वेळ मिळत नाही. सर्वांची काळजी घेणारी ती इतकी व्यस्त असते की तिला स्वतःची काळजी घेण्यासाठी वेळच मिळत नाही. त्यामुळेच अशा बऱ्याच गृहिणी आहेत, ज्या स्वतःच्या लुक्सकडे लक्षच देत नाहीत आणि त्यांचा लुक त्यांना स्वतःलाच कंटाळवाणा वाटू लागतो. अनेकदा नटून थटून आपल्याला कुठे जायचं आहे हा विचारच त्यांना व्यवस्थित राहण्यासाठी परावृत्त करत असतो. तुमचा लुक घरातही अत्यंत प्रेझेंटेबल असायला हवा. कारण अचानक कोणीही घरात आलं तर त्यावर तुमचे चांगला प्रभाव पडू शकेल. तुम्हाला घरच्या घरी स्टायलिश दिसण्यासाठी जास्त काहीही करण्याची आवश्यकता नाही. तुम्हाला तुमच्यातील काही लहानसहान बदलच अधिक सुंदर बनवतात. जाणून घ्या हा लहानशा पण गरजेच्या टिप्स ज्या तुम्हाला बनवू शकतात स्टायलिश....**



## अँकल लेंथ बॉटम

तुम्ही घरात पटियाला सलवार अथवा पंजाबी ड्रेस घालत असाल तर तुम्ही त्याऐवजी स्टायलिश राहण्यासाठी अँकल लेंथ बॉटम (ankle length bottom) चा उपयोग करा. हा लुक तुम्हाला आधुनिक आणि वेगळा लुक देतो आणि यामुळे तुम्ही घरातही अधिक स्टायलिश दिसू शकता. तुम्ही लांब कुरती जरी घातली असेल तरी तुमच्या या बॉटम लुकमुळे तुमच्या लुकमध्ये फरक पडतो आणि तुम्ही अधिक सुंदर आणि स्टायलिश दिसता. यासह तुम्ही तुमचे केसदेखील नेहमी व्यवस्थित विंचरून घरात असलात तरीही बांधून ठेवा.

## रंगांची योग्य निवड

रंगाची निवड योग्य असणे अत्यंत गरजेचे आहे. कारण रंगाची निवड चुकल्यास, तुमचा लुक पूर्ण बिघडू शकतो. त्यामुळे तुम्ही कोणताही आऊटफिट निवडला तरी त्याचा रंग कोणता आहे याची निवड तुम्ही योग्य करा. तुमचा लुक अधिक रिफ्रेशिंग आणि ताजातवाना होईल असेच रंग तुम्ही घरी घालण्यात येणाऱ्या कपड्यांचेही निवडा. तुम्ही फिके आणि गडद असे दोन्ही रंगांचे कपडे निवडू शकता. पण फिके रंग तुमचा लुक अधिक फिका करू शकतात. तुम्ही नियमित घालण्यासाठी घरचे कपडे जरा गडद रंगाचे वापरलेत तर नक्कीच अधिक चांगले दिसतील आणि लुक स्टायलिश होईल.

## जयपुरी अथवा पारंपरिक ओढणी

तुम्हाला जर घरात प्लेन सूट घालणे चांगले वाटत असेल तर तुम्ही त्यावर जयपुरी, लहरिया अथवा कोणतीही पारंपरिक ओढणी घ्या. घरात आपण ओढणी घेत नसलो तरीही अचानक कोणीही आले घरात की आपण पटकन ओढणी घेतोच. मग अशावेळी तुम्ही योग्य आणि स्टायलिश लुकसाठी या ओढण्यांचा वापर करा. साध्या आणि मोनोक्रोमेटिक सूटमध्ये तुम्ही नक्कीच कमाल लुक कॅरी करू शकता. सहसा बनारसी ओढणीचा वापर हा घरात करण्यात येत नाही. कार्यक्रमांसाठी तुम्ही या ओढण्या वापरता. पण इतर कोणत्याही साध्या ओढणीचा वापर तुम्ही करून स्टायलिश लुक मिळवू शकता. याशिवाय ओढणी घेताना तुम्ही ती योग्य कॅरी करता की नाही हेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे. काही महिला अशीच ओढणी ओढून घेतात. त्यामुळे तुम्ही घातलेल्या सूटचा लुक दबला जातो. तुम्ही एका हातावर अथवा दोन्ही बाजूला निऱ्या काढून ओढणी घेतली तर तुमचा लुक अधिक उठावदार दिसून येतो.

## साडी असेल तर करा अशी स्टायलिश

काही महिला घरातही साडीच नेसतात. अनेक गृहिणी साड्यांना प्राधान्य देतात. रोज साडी नेसणाऱ्या महिलाही आपल्याकडे मोठ्या प्रमाणात आहेत. पण घरातच आहोत म्हणून कशीही साडी नेसण्यापेक्षा तुम्ही घरीही स्लीव्हलेस अथवा क्रॉपटॉप ब्लाऊजचा उपयोग करून साडीला अधिक वेगळा आणि चांगला लुक देऊ शकता. तसंच सुळसुळीत साड्या असतील तर त्यावर तुम्ही वेगवेगळ्या पद्धतीचे आकर्षक ब्लाऊज आणि डिझाईनर ब्लाऊज घालून याचा लुक अधिक स्टायलिश करू शकता.



# काळजी शिफॉन साड्यांची...



**शिफॉन साडी (chiffon sarees) ही नेहमीच ट्रेंडमध्ये असते. पण बॉलीवूड अभिनेत्रींची ही सर्वात जवळची साडी मानली जाते. एकतर ही अत्यंत हलकी असते आणि दिसायलाही तितकीच आकर्षक असते. चित्रीकरणाच्या वेळी ही सांभाळणे अत्यंत सोपे जाते. वजनाला हलकी असल्यामुळे अनेक महिलांना ही साडी आवडते. पण अन्य साड्यांच्या तुलनेत शिफॉनची साडी लवकर खराब होते. महिलांच्या वॉर्डरोबमध्ये शिफॉन साडी नाही असं होणे शक्य नाही. ऑफिसमध्ये जाताना असो अथवा कोणत्याही कार्यक्रमाला असो प्रत्येक लुकसाठी शिफॉन साडी हा चांगला पर्याय आहे. पण तुम्हाला शिफॉनची साडी नेहमी नवी दिसायला हवी असेल तर काही सोप्या ट्रिक्स तुम्हाला माहीत असायला हव्यात...**

## हाताने धुवा साडी

शिफॉनची साडी एकदा नेसली की लगेच धुण्याची खरं तर गरज नाही. पण तुम्हाला जर वाटत असेल की, साडी खराब झाली आहे. खूप घाम लागला आहे तर तुम्ही बादलीत पाण्यामध्ये डिटर्जंट मिक्स करा आणि साधारण 15 मिनिट्स साडी त्यात भिजवून ठेवा. 2-3 वेळा पाण्यातून धुऊन त्यातील साबणाचे पाणी काढून टाका. सर्वात महत्त्वाचे म्हणजे वॉशिंग मशीनमध्ये ही साडी धुऊ नये. दुसरी गोष्ट हाताने धुतानादेखील अन्य कपड्यांसह ही साडी भिजवू नये. वेगळ्या बादलीत भिजवावी. शिफॉन साडीला अन्य कपड्यांचे डाग पटकन लागतात आणि नंतर हे डाग काढणं अत्यंत कठीण आहे. त्यामुळे तुम्ही ही काळजी नक्की घ्या.

## उन्हात सुकवू नका

काही जणांना साडी नेसून झाल्यावर हँगर लाऊन उन्हात सुकवायची सवय असते. तसंच काहींना धुतल्यानंतरही साडी डायरेक्ट उन्हात सुकवायची सवय असते. पण असे अजिबात करू नका. तसंच ही साडी खूप पिळू नका. त्यामुळे साडीवर सुरकुत्या येतात. घरात सावलीमध्येच ही साडी सुकवा. सूर्याची किरणे साडीवर पडू देऊ नका. साडी सुकल्यानंतर लगेच ती साडी फोल्ड करून अर्थात घडी घालून ठेऊ नका. काही शिफॉन साड्या अशाही असातात ज्यांना धुतल्यानंतर घडी केल्यावर अजिबात इस्त्रीची गरज भासत नाही.

## इस्त्री कशी कराल?

तुम्हाला शिफॉन साडीला इस्त्री करायची असेल तर तुम्ही पेपरचा वापर करा. वास्तविक आपण इस्त्रीचे टेंपरेचर नीट सेट करू शकत नाही. त्यामुळे अधिक गरम झाल्यास शिफॉनची साडी जळण्याचा धोकाही असतो. शिफॉनच्या साडीवर जर जरीचे डिझाईन असेल तर त्यावर इस्त्री करण्यासाठी तुम्ही सुती कापडाचा वापर करा आणि मगच प्रेस करा. असे केल्यास कोणत्याही अडचणीशिवाय शिफॉनची साडी तुम्हाला इस्त्री करून घेता येते.

## घडी करताना...

शिफॉन साडी तुम्ही व्यवस्थित फोल्ड करून नंतर वृत्तपत्रात बांधून आपल्या वॉर्डरोबमध्ये ठेवा. तुमच्याकडे एकपेक्षा अधिक शिफॉन साड्या असतील तर तुम्ही त्यादेखील अशाच स्वरूपात ठेवा. बऱ्याचदा आपण कपाटातून कपडे काढताना घाई करतो. त्यामुळे अशावेळी शिफॉनच्या साडीची घडी विस्कटण्याचा धोका असतो. पण वृत्तपत्रात बांधून ठेवली असल्यामुळे पटकन काढताही येते आणि खराबही होत नाही. तसंच शिफॉन साडी कपाटात हँगरवर लटकवून ठेऊ नका. यामुळे त्याचा कपडा खराब होतो.

## जास्त वेळ घडी...

तुम्ही जर घडी घालून वृत्तपत्रातमध्ये साडी ठेवली असेल तर साधारण आठवडा अथवा दोन आठवड्यात तुम्ही तपासा. वास्तविक जास्त काळ तुम्ही घडी घालून ठेवली तर त्याला वेगळा वास येऊ लागतो. थोडा वेळा काढून तुम्ही बाहेर ठेवा आणि मग पुन्हा कागदात घडी करून ठेऊन द्या. तुम्हालाही शिफॉनची साडी नेसणे आवडत असेल तर आम्ही दिलेल्या टिप्सच्या मदतीने तुम्ही अगदी तुमच्या जुन्या शिफॉनच्या साड्याही अशा जपू शकता.

# लग्नासाठी परफेक्ट साऊथ इंडियन साड्यांचे प्रकार

**लग्न म्हटले की, आपण काही खास साड्यांची निवड करतो. अशा साड्या ज्या साड्या परंपरेने आपण घेत असतो. उदा. पैठणी, कांजिवरम, प्युअर सिल्क, चंदेरी अशा साड्याची निवड केली जाते. पण साऊथ इंडियन पद्धतीच्या काही साड्या या लग्नांसाठी फारच सुंदर आणि वेगळा असा पर्याय आहे. जर तुम्हाला अशा पद्धतीच्या साड्या निवडायच्या असतील तर त्यांचे काही प्रकार आम्ही तुमच्यासाठी निवडले आहेत. तुम्हाला हव्या तशा हेव्ही प्रकारात या साड्या तुम्हाला मिळू शकतात. त्याही तुमच्या बजेटमध्येच. चला जाणून घेऊया साड्यांचे असे काही प्रकार जे लग्नासाठी आहेत फारच परफेक्ट...**



- अंकित पट्टू साडी : साऊथ इंडियन प्रकारातील ही अंकित पट्टू साडी लग्न आणि कोणत्याही मंगल कार्यासाठी खूपच सुंदर दिसते. अंकित पट्टू साडीचा काठ हा थोडासा मोठा असतो. या साड्यांच्या काठावर हत्ती, मोर, फुलांची अशी नक्षी असते. या साडीच्या अंगभर वेगवेगळ्या बुट्टी असतात. सिल्क अशा प्रकारातील या साड्या असल्यामुळे या साड्या नेसायला खूप सोप्या असतात. या साड्या चापून चोपून बसतात. लग्नासाठी अशा साड्या घेतल्या असतील तर त्या अगदी व्यवस्थित नेसा. या साड्यांवर हेवी ब्लाऊज घातले तर ते अधिक चांगले दिसतात.
- चेत्तिनाड साडी : साऊथ इंडियन प्रकारातील आणखी एक साडी म्हणजे चेत्तिनाड साडी. या साडीचे नावही तुम्ही नक्कीच ऐकले असेल. चेत्तिनाड सिल्क साडी या साडीचा काठ आकर्षक असतो. साडीचा काठ वगळता या साड्यांवर लहान लहान आकाराच्या बुट्टी असतात. या साड्यांचे काठ इतके सुंदर असतात की, या साड्यांचे काठच सुंदर असल्यामुळे अशा साडया नेसल्यानंतर खूपच सुंदर दिसतात. जर तुम्ही लग्नासाठी अशा साड्या घेणार असाल तर तुम्ही साड्यांचे गडद रंग निवडा. म्हणजे ते दिसायला अधिक सुंदर दिसतात.
- धरमवर साडी : साऊथ इंडियन साड्यांमधील आणखी एक प्रकार म्हणजे धरमवरम साडी. हा साडीचा प्रकार तुम्हाला थोडासा बनारसी साड्यांच्या जवळ जाणारा वाटेल. या साड्यांचे काठ मोठाले असतात. या साड्यांचे काठ गोल्डन, सिल्व्हर अशा स्वरुपात मिळतात. त्यामुळे तुम्ही थीमनुसार साड्यांची निवड करु शकता. या प्रकारातील साड्या हेव्ही असतात. त्यामुळे त्या लग्नात नवरीलाही नेसता येतात.
- कोनार्ड साडी : कोनार्ड साडी हा प्रकार त्याच्या काठांमुळे ओळखला जाणारा असा प्रकार आहे. या साड्यासुद्धा सुंदर आणि आकर्षक प्रकारातील आहेत. कोनार्ड साड्यांमध्ये गोल्डन जरींमध्ये असतात. याचे काठ, प्लेन किंवा त्यावर भरलेले मिळतात. हे काठ आकर्षक असल्यामुळे तुम्हाला या कोनार्ड साड्या नेसता येतात. याशिवाय साडीच्या संपूर्ण बॉडीवर तुम्हाला बुट्टी असते. तुमच्या आवडीनुसार तुम्ही बुट्ट्यांची निवड करू शकता.
- कांचिपुरम साडी : कांचिपुरम साडी ह प्रकार देखील आता काही नवा राहिलेला नाही. खूप जणांना कांचिपुरम साड्या या खूप आवडतात. कांचिपुरम साड्या या खास लग्नासाटई असतात. कांचिपुरम साड्यामध्ये तुम्हाला वेगवेगळे प्रकार नक्कीच पाहायला मिळतील. कांचिपुरम साड्या ब्रोकेट, बुट्टी अशा प्रकारातही मिळतात. कांचिपुरम साड्या या चापूनचोपून नेसल्या की, त्या छान दिसतात.

# पावसाळ्यात लग्न? नववधूसाठी मेकअप टिप्स!

कोरोना महामारी आणि लॉकडाऊनमुळे अनेकांची लग्ने मागील दोन वर्षांपासून रखडली आहेत. आता सर्व काही पूर्ववत होत असल्यामुळे लग्नकार्य लवकरात लवकर उरकून घेतली जात आहेत. मात्र सध्या लग्नाचा सीझन तर नाहीच; शिवाय पावसाळाही जोरदार आहे. पावसाळा रोमँटिक आणि उत्साहवर्धक ऋतू असला तरी या काळात लग्नकार्य करताना थोडी पंचाईत होण्याची शक्यता आहे. ज्यामुळे लग्नापूर्वीची तयारी, लग्नविधी, लग्नस्थळ निवडणे, जेवणाची व्यवस्था, मंडप डेकोरेशन, वाजंत्री, आमंत्रण देणे, लग्नानंतरचे विधी अशा सर्व गोष्टींसाठी इतर सीझनपेक्षा जास्त काळजी आणि सावधगिरीची गरज असते. आता या सर्व गोष्टी जुळून आल्या तरी लग्नात सर्वात महत्त्वाचा असतो नववधूचा लुक... या काळात लग्न करणाऱ्या नवरीने मेकअप करताना देखील थोडी अधिक काळजी घेण्याची गरज आहे. वास्तविक लग्नात तुमचा लुक सर्वात बेस्ट असावं असं तुम्हाला वाटत असतं. पण या एखादा खास लुक करण्याचा प्रयत्न या सीझनमध्ये यशस्वी होईलच असं नाही. यासाठी पावसाळ्यात लग्न असेल तर नवरीने मेकअपबाबत या काही खास टिप्स अवश्य फॉलो कराव्या.

## नवरीसाठी मेकअप टिप्स...

- मेकअप करण्यापूर्वी चेहऱ्यावर बर्फ लावा. कारण या काळात नेहमीपेक्षा जास्त घाम येण्याची शक्यता असते.
- या काळात लग्न असणाऱ्या नववधूने स्वतःला नेहमीपेक्षा जास्त हायड्रेट ठेवण्याची गरज आहे. यासाठी लग्नापूर्वी काही दिवस सतत पाणी पिण्याची, ज्युस पिण्याची सवय स्वतःला लावा. ज्यामुळे लग्नात तुमच्या चेहरा टवटवीत दिसेल.



- लग्नासाठीमेकअपसाहित्यवॉटर प्रूफ निवडा. ज्यामुळे तुमचा मेकअप पसरणार नाही. कारण जर तुम्हाला पावसात जावे लागले तरी मेकअप खराब होणार नाही.
- चेहरा जास्त तेलकट दिसू नये यासाठी मॅट फिनिश लुकचा मेकअप करा. जर तुमची त्वचा तेलकट असेल तर फाऊंडेशन आणि मेकअप बेस मॅट फिनिश देणारे निवडा.
- पावसाळ्यात वातावरण दमट असल्यामुळे मेकअप सतत टचअप करू नका. शक्य असल्यास नैसर्गिक लुक देणारा मेकअप करा. डोळ्यांचा मेकअप करताना आयशॅडो आधी प्रायमर लावा. या काळात क्रिम बेस अथवा ग्लीटर लुकचा आय मेकअप करणे टाळा.
- जेल लायनरचा वापर डोळ्यांवर केल्यास घाम आल्यावर ते पसरण्याची शक्यता कमी असते. कोणत्याही ऋतूमध्ये नवरीने वॉटरप्रूफ मस्कारा आणि आय मेकअप करावा. कारण पाठवणीला रडल्यास मेकअप खराब होत नाही.
- पावसाळी वातावरणात क्रीम ब्लश कधीच वापरू नका. त्याऐवजी पावडर ब्लश उत्तम पर्याय ठरेल. पावसाळ्यात गरम झाल्यास तुम्ही सतत पाणी अथवा ज्युस पिणार यासाठी मेकअप करताना लिपस्टिक लावण्यापूर्वी कन्सिलर अवश्य लावा.

## शॉर्ट न्यूज

### रस्त्यावर दूध ओतून सरकारचा निषेध

**नेवासा :** दूधउत्पादक शेतकरी अडचणीत असून, इतर राज्याप्रमाणे योग्य भाव मिळण्यासासाठी महाराष्ट्रात दूध मूल्य आयोगाची स्थापना करावी, या मागणीसाठी नगर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर दूधउत्पादक शेतकऱ्यांनी दूध ओतून आंदोलन केले. नेवासा तालुक्यातील प्रवरासंगम येथील श्री सिद्धेश्वर डेअरीसमोर हे आंदोलन करण्यात आले. केरळ, पंजाब, हरियाणामध्ये दुधाला प्रति लिटर ४० रुपये भाव दिला जातो, मात्र महाराष्ट्रात २७ रुपये दर आहे. त्यासाठी दूध मूल्य आयोगाची स्थापना करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. अशोकराव ढगे यांनी केली.

### प्रलंबित अनुदान शेतकऱ्यांना तातडीने मिळावे

**कोपरगाव :** विधानसभा मतदार संघातील विविध अनुदान योजने अंतर्गत शेतकऱ्यांचे प्रलंबीत अनुदान व सन २०२३-२४ मधील पीक विमा कंपनीकडे प्रलंबीत असलेली ७५ टक्के रक्कम अजूनही शेतकऱ्यांना मिळालेली नाही. त्यामुळे सदरचे प्रलंबित अनुदान हे तातडीने शेतकऱ्यांच्या खाती वर्ग व्हावे अशी मागणी आ. आशुतोष काळे यांनी मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

### संगमनेर बस स्थानकास पाच लाखाचा पुरस्कार

**संगमनेर :** बस स्थानकास राज्य सरकाराचा पाच लाखाचा पुरस्कार जाहीर संगमनेर एसटी बस स्थानकास महाराष्ट्र शासनाचा स्वच्छता अभियानचा नाशिक उपविभागातून दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे. हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार अ विभागातील संगमनेर स्थानकास क्रमांक दोन चा पुरस्कार मिळाला आहे. तर ब श्रेणीतील लोणी बस स्थानकासही द्वितीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले असल्याची माहिती संगमनेर आगार व्यवस्थापक प्रशांत गुंड यांनी दिली.

### मुलाकडून वडिलांना लाथा बुक्क्यांनी मारहाण

**राहुरी :** सचिन बाळासाहेब फुगारे, रा. राहुरी खुर्द, ता. राहुरी, हे त्यांची आई व मुलगी त्यांच्या घरात होते. रात्री ९ वाजेच्या सुमारास सचिन फुगारे यांचा मुलगा ओम सचिन फुगारे हा घरी आला. त्यावेळी त्याने बहिण व आजीला शिवीगाळ व मारहाण करु लागला. तेव्हा सचिन फुगारे यांनी त्याला आडविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्याने वडिल सचिन फुगारे यांना लाथा बुक्याने मारहाण करून विळी मारून जखमी केले. सचिन बाळासाहेब फुगारे यांच्या फिर्यादीवरून आरोपी ओम सचिन फुगारे, रा. राहुरी खुर्द, ता. राहुरी, याच्यावर गुन्हा दाखल केला.

### ऑलिम्पिक दिवस उत्साहात साजरा


**नगर :** अहमदनगर ऑलिम्पिक असोसिएशन व विविध क्रीडा संघटनेच्या वतीने शहरातील वाडियापार्क क्रीडा संकुलमध्ये ऑलिम्पिक दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये खेळाचे महत्त्व त्याचप्रमाणे आहाराविषयी माहिती देऊन खेळाडूंना ऑलिम्पिक दिवसाचे महत्त्व सांगण्यात आले. सरावादरम्यान घ्यावयाची काळजी यावर चर्चा करण्यात आली. क्रीडा संघटनांच्या प्रचार व प्रसारासाठी काय करता येईल? व खेळाडूंची गुणवत्ता कशी वाढवता येईल? यावर उपस्थित ज्येष्ठ प्रशिक्षकांनी मार्गदर्शन केले.

# जिल्ह्यात ४०० क्विंटल भुईमुग बियाणांचे शेतकऱ्यांना अनुदानावर वाटप

## प्रतिबॅगसाठी शेतकऱ्यांना मिळाले दोन हजारांचे अनुदान

**नगर : प्रतिनिधी**

**कृषी उन्नती योजने अंतर्गत अन्न व पोषण सुरक्षा योजनेमध्ये उन्हाळी हंगामात बियाणे व लागवड साहित्य वाटप करण्यात आले. यानुसार कृषी विभागाच्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अनुदानावर ४०० क्विंटल उन्हाळी भूईमुग बियाणे वाटप करण्यात आले आहे.**



नगर जिल्ह्यात सुमारे ६ हजार १७१ हेक्टर क्षेत्र उन्हाळी भुईमुग पिकाखाली आहे. यानुसार जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या वतीने अनुदानावर उन्हाळी हंगामात टीएजी-२४ या वाणाचे भुईमुग बियाणे वाटप करण्यात आले. ४० किलोग्रॅमच्या एका बॅगवर शेतकऱ्यांना दोन हजारांचे अनुदान मिळाले. त्यानुसार १५७ रुपये प्रतिकिलोच्या ४० किलो बॅगची किंमत बाजारात ६ हजार २८० रुपये होती. यानुसार शेतकऱ्यांना सातबारा उताऱ्यावर कृषी सेवा केंद्रामार्फत ६ हजार २८० रुपयांची भुईमुग बियाणाची बॅग अनुदानावर ४ हजार २८० रुपयांना मिळाली.

यामध्ये नगर तालुक्यात १२१ हेक्टर क्षेत्र भुईमुग पिकाखाली आहे. यामध्ये २३ क्विंटल बियाणे अनुदानावर शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले. तसेच पाथर्डीत ११७८ हेक्टर क्षेत्रासाठी ७२.६० क्विंटल, कर्जत ६४२ हेक्टरसाठी १६.४० क्विंटल, जामखेडसाठी १०.८० क्विंटल, श्रीगोंदे ७१.८० क्विंटल, श्रीरामपूर ४७ क्विंटल, राहुरी ४२.८० क्विंटल, नेवासे ४.६० क्विंटल, संगमनेर ३० क्विंटल, राहाता तालुका १५ क्विंटल, तर अकोले तालुक्या ४८.६० क्विंटल असे एकूण ४०० क्विंटल भुईमुग बियाणे शेतकऱ्यांना अनुदानावर वाटप करण्यात आले, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी दिली. पारनेर आणि कोपरगाव तालुक्यात हे भुईमुगाचे बियाणे अनुदानावर मिळाले नसल्याचे दिसून येत आहे.

**२६९०० शेतकऱ्यांना ८०७० क्विंटल सोयाबिन वाटप**

खरीप हंगामात जिल्ह्यातील २६ हजार ९०० शेतकऱ्यांना अनुदानावर ८०७० क्विंटल फुले संगम वाणाचे बियाणे वाटप करण्यात आले. ३० किलोच्या प्रतिबॅगची बाजारात किंमत २४०० रुपये आहे. प्रतिबॅगसाठी शेतकऱ्यांना ६०० रुपयांचे अनुदान मिळाले असून शेतकऱ्यांना १८०० रुपयांत ही बॅग मिळाली, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी दिली.

## वाचकांच्या लेखणीतून

### आलेल्या संधीचे सोने करावे

वडगाव गुंडच्या लंके बंधूंचे राज्यसेवा (आयोग) परीक्षेत यश ही बातमी वाचली (पारनेर दर्शन, २७ जून, गुरुवार). येथील शुभम भरत लंके आणि मंगेश सावळेराम लंके या दोघा बंधूंनी राज्यसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळविले आहे. आपल्या ग्रामीण तालुक्यातील नवयुवक नावाजण्याजोग्या क्षेत्रात आपले नाव गाजवीत आहेत. ही घटना नक्कीच कौतुकास्पद आहे.





शुभम आणि मंगेश या उच्चशिक्षित बंधुद्वयांचा जि.प. प्राथमिक शाळेपासूनच हुशार विद्यार्थी म्हणून नावलौकिक होता. आता तर त्यांनी महाराष्ट्र राज्यसेवा आयोगाच्या परीक्षेतही घवघवीत यश मिळविले आहे! या दोघांचीही नगरपरिषद प्रशासन व करनिर्धारण अधिकारी म्हणून नियुक्ती झालेली आहे.

पारनेर तालुक्यातील तमाम जनतेने या लंके बंधूंचे मनापासून अभिनंदन केले पाहिजे. कारण तो आपल्या तालुक्याचा मान आणि अभिमानही आहे. प्रत्येक क्षण हा नवीन आरंभ असतो, असे टी.एस.इलियट हा विद्वान म्हणतो. हे लंके बंधू आलेल्या संधीचे सोने करतील अशी अपेक्षा करूया.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

# एसटी कर्मचारी पुन्हा आंदोलनाच्या तयारीत

**मुंबई : प्रतिनिधी**



**राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटी कर्मचाऱ्यांना वेतन मिळावे, प्रलंबित महागाई भत्ता आणि त्यातील फरक, तसेच मूळ वेतनात जाहीर केलेली पाच हजार, चार हजार, अडीच हजार रुपयांऐवजी सरसकट पाच हजार रुपयांची वाढ द्यावी, यासह विविध मागण्यांसाठी एसटी कर्मचारी पुन्हा आंदोलनाच्या तयारीत आहेत. राज्याच्या विधिमंडळ अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर एसटी कामगार संघटनांनी ९ आणि १० जुलै रोजी आझाद मैदानात आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.**

याबाबतचा ठराव महाराष्ट्र एसटी कामगार संघटना, एसटी कामगार सेना आदी संघटनांच्या पार पडलेल्या बैठकीत घेण्यात आला. यावेळी महाराष्ट्र एसटी कामगार संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे, सरचिटणीस हिरेन रेडकर आदी उपस्थित होते. कर्मचाऱ्यांना इनडोअर आणि आउटडोअर मेडिकल कॅशलेस योजना लागू करावी, एसटीचे खासगीकरण बंद करावे. वेळापत्रकातील त्रुटी दूर कराव्यात आदी विविध मागण्यांसाठी हे आंदोलन होणार आहे.

# भंडारदऱ्याच्या पाणलोटात पाऊस रुसला !

## जून महिन्यात मान्सूनने दिली हुलकावणी

**अकोले : प्रतिनिधी**

**गेल्या काही दिवसांपासून भंडारदऱ्यावर पाऊस रुसला असल्याचे चित्र दिसत आहे. जून महिना उजाडला तरी मान्सूनने भंडारदऱ्याला हुलकावणी दिली आहे. त्यामुळे आदिवासी बांधवांनी शेतीच्या मशागतीची कामे आटोपली असली तरी भात लागवडीसाठी शेतकरी मोठ्या पावसाच्या प्रतीक्षेत आहे.**



अकोले तालुक्यातील भंडारदरा म्हणजे अहमदनगर जिल्ह्याची चेरापुंजी समजली जाते. भंडारदऱ्याला ७ जूनलाच मृग नक्षत्रात पावसाचे वेध लागतात. यंदा संपूर्ण भारतात मान्सूनचे वेळेवर आगमन झाले. बऱ्याच ठिकाणी पावसाने मोठ्या प्रमाणात हजेरी लावली. मात्र, भंडारदरा धरणाचे पाणलोटही याला अपवाद राहिले नाही. पाणलोटात रतनवाडी, साम्रद, घाटघर या भागात सुरुवातीला पावसाने जोरदार बॅटिंग केली. परंतु भंडारदरा धरणावर मात्र अतिशय अल्प प्रमाणात पाऊस पडला. जून महिन्यात भंडारदरा धरणाच्या पाणलोटात सरासरी १ हजार मिलिमीटर पाऊस पडतो. परंतु जून संपत आला तरी पाणलोटात ५०० मिलीमीटर देखील पावसाची नोंद झालेली नाही.

घाटघर, रतनवाडी या भागात भाताची धूळवाफा पेरणी झाली असल्यामुळे भाताची रोपे तरारून हिरवीगार झाली आहेत. आता या शेतकऱ्यांना मोठ्या पावसाची गरज आहे. भात आवणीसाठी पाण्याची जास्त गरज असल्याने मोठ्या पावसाची आवश्यकता असते. सुरुवातीला पाऊस झालेला असल्याने भात रोपे लागवडीला आले आहेत. परंतु या भागात पाऊस मात्र रुसला आहे. हलक्या स्वरूपात पडणाऱ्या पावसावर भाताची लागवड करणे शक्य नाही. भंडारदऱ्याच्या पाणलोटात चक्क पाऊस रुसला आहे. आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतीची मशागतीची कामे आटोपली आहेत.

(पान १ वरून)

## अर्थसंकल्पात घोषणांचा पाऊस ! ३ सिलेंडर मोफत, महिन्याला १५०० रुपये; अजित पवारांच्या बजेटमधील टॉप १० घोषणा

दुर्बल घटकातील मुलींना शिक्षणशुल्क आणि परीक्षा शुल्क माफ करण्यात येणार आहे. या निर्णयाचा लाभ राज्यातील २ लाख ५ हजार मुलींना होणार असून २०२४-२५ पासून ही योजना सुरू होत आहे.

**मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेची घोषणा**

अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्प मांडताना मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेची घोषणा केली. या योजनेतून पात्र कुटुंबाना वर्षाला ३ सिलेंडर मोफत देण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

शुभमंगल योजनेचा निधी वाढवला

विवाहित मुलींसाठीच्या शुभमंगल योजनेच्या निधीत वाढ करण्यात आली आहे. या घोषणेंतर्गत आता १० हजारांऐवजी २० हजार रुपये निधी देण्यात येणार असल्याची माहिती अजित पवार यांनी दिली.

महिलांसाठी १० हजार पिंक रिक्षा

राज्यातील महिलांसाठी १० हजार पिंक रिक्षा देण्यात येतील, तसेच नवीन रुग्णवाहिका खरेदी केल्या जातील, अशी घोषणाही अजित पवारांनी केली.

२५ लाख महिला लखपती दिदी

यावर्षी २५ लाख महिलांना लखपती दिदी बनवण्याचा शासनाचा विचार आहे. तर, गाईच्या दूध उत्पादक शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी प्रति लिटर ५ रुपयाचे अनुदान १ जुलैपासून देण्यात येणार

नवी शासकीय महाविद्यालये स्थापन होणार

राज्यात सध्या १ लाख लोकसंख्येमागे ८४ डॉक्टर्स आहेत.२०३५ पर्यंत १ लाख लोकसंख्ये मागे १०० हून अधिक डॉक्टर्स करण्यासाठी वैद्यकीय महाविद्यालयांची प्रवेश क्षमता वाढवणं आवश्यक आहे. त्यासाठी राज्यात १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेची नवी शासकीय महाविद्यालये आणि ४३० खाटांची संलग्न रुग्णालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार, जालना, हिंगोली, धाराशिव, परभणी, नाशिक,जळगाव, अमरावती, बुलढाणा, वाशिम, वर्धा, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, अंबरनाथ येथे ही रुग्णालये उभारण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना

मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना जाहीर करण्यात आला आहे. या योजनेनंतर्गत दरवर्षी १० लाख तरुण- तरुणींना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तसेच, दरवर्षी १० हजार रुपयांचा स्टायफंड या तरुणांना मिळणार आहे.

### वाळू धोरणामध्ये अधिक सुलभता आणण्यासाठी शासन कटिबद्ध

साधून, तज्ज्ञांची चर्चा करून या धोरणात अधिक सुधारणा कशा करता येईल यासाठी सरकारची तयारी असल्याचे त्यांनी त्यांनी सांगितले.

वाळू धंद्याबाबत वेगवेगळे प्रवाह आता पुढे येत आहेत. यामध्ये वाळू खुली करण्यापासून ते ग्रामपंचायत तसेच नगरपालिका हद्दीमध्ये स्थानिक पातळीवर त्यांनाच रॉयल्टी घेण्याचे आधिकार देण्याची कार्यवाही देण्यात येतील का याबाबतही आता विचार करून वाळू बंधनमुक्त करण्याबाबतही शासन विचार करीत असल्याचे स्पष्ट करुन मंत्री विखे पाटील म्हणाले की, मागील पाच ते सहा वर्षांची आकडेवारी पाहीली असता, नवीन वाळू धोरणामुळे राज्याच्या महसूल उत्पन्नात कुठेही नुकसान झालेले नाही. यामुळे वाळूच्या धोरणामुळे शासनाचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान होत असल्याचे निर्माण केलेले वातावरण निराधार आहे. असे विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

या व्यवसायातील गुन्हेगारीकरण थांबविण्यासाठी शासनाचा प्रयत्न असून, महसूल अधिकारी, कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या हल्ल्यांबाबतही जिल्हाधिकाऱ्यांना कारवाईचे सर्व अधिकार देण्यात आले असल्याचे ना.विखे पाटील यांनी सांगितले.






# पारनेर महाविद्यालयाबरोबरच विकास अधिकारीही उत्कृष्ट!

■ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून बहुमान कुलगुरू, प्र. कुलगुरूंकडून सन्मान

**पारनेर : प्रतिनिधी**

**जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या पारनेर येथील न्यू आर्टस कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्सला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने उत्कृष्ट महाविद्यालय तर विद्यार्थी विकास मंडळांतर्गत भुगोल विभागाचे प्राध्यापक डॉ. दत्तात्रेय घुंगार्डे यांना उत्कृष्ठ विकास अधिकारी पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला.**

शैक्षणिक वर्ष २०२१-२३ दरम्यान विद्यापीठाच्या विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केल्याबद्दल या दोन्ही पुरस्कारांवर पारनेर महाविद्यालयाने नाव कोरले.

दोन्ही पुरस्कार मिळाल्याबद्दल जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव अ‍ॅड. विश्वासराव आठरे, सहसचिव जयंतराव वाघ, खजिनदा अ‍ॅड. दिपलक्ष्मी म्हसे यांच्यासह संस्थेचे सर्व पदाधिकारी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर, उपप्राचार्य डॉ. अनिल आठरे, अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे समन्वयक डॉ. तुकाराम थोपटे, कार्यालयीन अधिक्षक सावकार काकडे यांनी अभिनंदन केले.



■ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने पारनेर महाविद्यालयास उत्कृष्ट महाविद्यालय तर डॉ. दत्तात्रेय घुंगार्डे यांना उत्कृष्ठ विकास अधिकारी पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

### महाविद्यालयाच्या उपक्रमांची दखल

रस्ता सुरक्षा अभियान, कमवा व शिका योजना, विद्यार्थी अपघात विमा सुरक्षा योजना, गरीब विद्यार्थी आर्थिक सहाय्यता निधी योजना, वृक्षारोपन, दिव्यांग कार्यशाळा, मधुमक्षिका पालन, निर्भय कन्या अभियान, युवा साहित्य संमेलन, महिला दिन, राजभाषा दिन, वाचन प्रेरणा दिन, जागतिक पुस्तक दिन, पर्यावरण दिन, स्वच्छता अभियान तसेच विविध स्पर्धांचे आयोजन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले. पुरस्कारासाठी निवड करताना या उपक्रमांची दखल घेतली गेली.

### गौरवशाली बाब

पारनेर महाविद्यालय हे नेहमी सामाजिक उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात अग्रेसर राहिलेले आहे. महाविद्यालयाने पुरस्कारांची परंपरा कायम राखत सातत्यपूर्ण कौशल्याधिष्टीत उपक्रम राबविण्यावर भर दिलेला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे हे दोन्ही पुरस्कार महाविद्यालयास प्राप्त होणे ही अतिशय आनंदाची, गौरवशाली बाब आहे.

डॉ. लक्ष्मणराव मतकर
प्राचार्य

### विद्यार्थी केंद्रीत उपक्रम

विद्यार्थी केंद्रीत उपक्रम राबविण्यावर विद्यार्थी विकास मंडळाचा नेहमीच भर राहिलेला आहे. असे उपक्रम राबविल्याने विद्यार्थ्यांमध्ये विविधांगी कौशल्य निर्माण होतात तसेच विद्यार्थ्यांना रोजगाराच्या विविध संधी मिळण्यास त्याचा फायदा होतो.

डॉ. अनिल आठरे
उपप्राचार्य

# पुणेवाडीच्या विकासासाठी खा. लंके कटीबद्ध

सब स्टेशनसह, रस्ते, बंधाऱ्यांसाठी निधी

**पुणेवाडी : प्रतिनिधी**

**ग्रामीण भागाचा सर्वांगिण विकास डोळयापुढे ठेऊन विधानसभा सदस्य म्हणून काम करताना विद्यमान खासदार नीलेश लंके यांनी प्रत्येक गावाला कोटयावधींचा निधी दिला. आता खासदार म्हणून ते ग्रामीण भागाच्या विकासासाठी कटीबध्द असल्याचे सांगतानाच खा. लंके यांनी पुणेवाडीत वीजेचे सब स्टेशन, रस्ते, बंधारे, शेतपानंद रस्त्यांसाठी निधी देत लोकप्रतिनिधीची भुमीका चोख बजावली असल्याचे प्रतिपादन पुणेवाडीच्या सरपंच रूपालीताई रेपाळे यांनी केले.**

खा. लंके यांच्या माध्यमातून जिल्हा परिषदेमार्फत पुणेवाडी ग्रामपंचायतीस कचरा संकलनासाठी घंटा गाडी देण्यात आली. या गाडीचे पुजन भैरवनाथ व खंडोबा देवस्थानच्या पुजाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच रेपाळे बोलत होत्या.

सरपंच रेपाळे म्हणाल्या, पुणेवाडी व परिसरात वीजेची मोठी समस्या असल्याने तत्कालीन आमदार नीलेश लंके यांच्याकडे त्याबाबत पाठपुरावा करण्यात आल्यानंतर त्यांनी तत्कालीन उर्जाराज्यमंत्री प्राजक्तदादा तनपुरे यांच्याकडे पाठपुरावा करू पुणेवाडीचे सब स्टेशन कार्यान्वीत करून घेण्यात यश मिळविले. शेतपानंद रस्त्यांसाठीही लंके यांनी मोठा निधी दिला. जलसंधारणाचे महत्व लक्षात घेउन बंधाऱ्यांसाठीही त्यांनी निधी उपलब्ध करून दिला असून यापुढील काळात पुणेवाडी गावासाठी निधीची कमतरता पडणार नाही. असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी बाजार समितीचे संचालक मारूती रेपाळे, श्रीनाथ शिक्षण संस्थेचे सचिव मोहन रेपाळे, उपसरपंच प्रशांत सखाराम बोरूडे, ग्रामसेवक दाते, निलमताई पोटे, चांगुणाबाई पोटे, संजय बजाबा रेपाळे, छबन चेडे, राजू बोरूडे, भिमाजी वाळुंज, रंगातात्या रेपाळे, बाळूमामा शिंदे, कचरूमामा रेपाळे, किसनराव रेपाळे, जालिंदर रेपाळे, दादाभाऊ मामा रेपाळे, राहुल देवराम पोटे, मोहन तात्या बोरूडे आदी उपस्थित होते.



■ जिल्हा परिषदेमार्फत कचरा संकलनासाठी देण्यात आलेल्या घंटागाडीचे श्री भैरवनाथ व श्री खंडोबा देवस्थानच्या पुजाऱ्यांकडून पुजन करण्यात आले.

### पुणेवाडीकरांचे लंकेंना पाठबळ

कोणतेही काम घेऊन गेल्यावर ते मार्गी लावण्यात हातखंडा असलेल्या खा. नीलेश लंके यांनी पुणेवाडीसाठी आजवर भरभरून निधी दिला. लंके हे आमदार होण्यापूर्वीचा काळ आणि ते आमदार झाल्यानंतरच्या काळाची तुलना केली तर नजरेत भरण्याजोगी कामे त्यांनी मार्गी लावली आहेत. भविष्यातही मार्गी लागतील असा विश्वास जनतेमध्ये असल्याने अलिकडेच पार पडलेल्या लोकसभा निवडणूकीत मतदारांनी लंके यांना पुणेवाडीतून मताधिक्य दिले आहे.

प्रशांत बोरूडे, उपसरपंच


# जनावरांच्या खरेदी-विक्रीसाठी टॅगिंग बंधनकारक

■ पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. नांदे यांची माहिती
■ भारत पशुधन प्रणालीचे पालन करण्याचेही बंधन

**सुपा : शरद रसाळ**

**भारत पशुधन प्रणालीवर नोंद करून जनावरांचे ईयर टॅगिंग केल्याशिवाय कोणत्याही जनावरांची खरेदी-विक्री करता येणार नसल्याची माहिती पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. एस. व्ही.नांदे यांनी दिली.**

पशुसंवर्धन विभागाच्या निर्णयानुसार पशुधनाची माहिती एकत्रीत उपलब्ध व्हावी, त्यांचे आजार, लसीकरण तसेच इतर माहीती उपलब्ध व्हावी यासाठी भारत पशुधन प्रणाली सुरू करण्यात आली आहे. या प्रणालीवर पशुधनाची नोंद करण्यासाठी सर्व पशुंना ईअर टॅगिंग करणे बंधनकारक आहे. टॅगिंगवरील बारकोडमुळे संबंधित पशुधनाच्या सर्व माहीतीची नोंद होणार आहे. पशुधनाचे मालक, खरेदी-विक्री, आजार, लसीकरण, प्रजननाची माहीतीही त्यात असेल.



### टॅगिंगशिवाय वाहतूक करता येणार नाही

जनावरांचे वाहतूक करताना त्या जनावरांचे ईअर टॅगिंग असणे गरजेचे आहे. टॅगिंगशिवाय वाहतूक केल्यास संबंधित वाहतूकदार, मालक, यांच्यावर कायदेशीर कारवाई होणार आहे. जनावरांची विक्री व वाहतूक करताना राज्यातील जनाववरांचे टॅगिंग असल्याची खात्री करूनच पशुधन विकास अधिकारी पशुसंवर्धन आयुक्त आरोग्य तसेच वाहतूक प्रमाणपत्र देणार आहेत.

### भरपाई देखील मिळणार नाही

नैसर्गिक आपत्ती, विजेचा धक्का, वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामुळे मृत्यमुखी पडलेल्या जनावरांचे टॅगिंग असल्याशिवाय पशुपालकाच्या मालकास नुकसान भरपाई मिळणार नाही.

### तालुक्यातील पशुपालकांनी टॅगिंग करावे

जनावरांना टॅगिंग नसेल तर शानाच्या पशुवैद्यकिय संस्था, दवाखान्यांमधून देण्यात येणारी वैद्यकिय सेवा देण्यात येणार नाही. भविष्यात पशुधनाच्या योजनांचा लाभही टॅगिंगशिवाय मिळणार नाही. पारनेर तालुक्यातील सर्व पशुपालकांनी पशुधनाचे टॅगिंग करून त्याची नोंद पशुधन प्रणालीवर करून घ्यावी.

डॉ. अरविंद रेपाळे
पशुधन विकास अधिकारी, पारनेर

## पत्रकार शिरीष शेलार यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा

धर्मनाथ विद्यालय व अंगणवाडीत वृक्षारोपण



**जवळा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील जवळा येथील वृत्तपत्र एजंट व पत्रकार शिरीष शेलार यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी धर्मनाथ विद्यालयात तसेच अंगणवाडी परिसरात वृक्षारोपण करीत शेलार यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रम करीत साजरा करण्यात आला.श**

यावेळी पारनेर तालुका पत्रकार संघ, पारनेर तालुका मराठी पत्रकार संघ, जवळा ग्रामस्थ, विविध संस्थांचे पदाधिकारी यांनी शेलार यांचा सत्कार करीत वाढदिवस निमित्ताने सन्मान करण्यात आला. वनराई संस्थेचे संस्थापक व पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे सचिव लतिफ राजे यांनी वृक्षारोपण करण्यासाठी पन्नास रोपे उपलब्ध करून दिली.

यावेळी धर्मनाथ विद्यालयाचे प्राचार्य रामदास कदम, अझहर पठाण, समीर काळे, अनिल बोरुडे, संदीप कवाद, गोरक्षनाथ शिंदे, राम कदम हारुण गावीत, प्रभाकर महाराज पठारे, प्रकाश बडवे, पत्रकार संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक मुकुंदराव निघोजकर, ग्रामविकास अधिकारी बाबाजी खामकर ,अध्यक्ष बाबाजी वाघमारे, जिल्हा उपाध्यक्ष विनोद गायकवाड, ईरा इंटरनॅशनलच्या प्राचार्या सोनाली सालके , अंगणवाडी सेविका संगिता विश्वासराव आदी उपस्थित होते.

यावेळी ईरा इंटरनॅशनलच्या प्राचार्या सोनाली सालके म्हणाल्या गेली पंचवीस वर्षांपासून शिरीष शेलार हे पत्रकारीता करीत असून वृत्तपत्र एजंट म्हणून काम करताना घरोघरी पेपर वाटप करीत ते लोकशिक्षणाचा आदर करण्याचे काम करीत आहेत. गेली विस वर्षांपासून ते सामाजिक उपक्रम राबवीत वाढदिवस साजरा करण्याचे काम करीत सामाजिक सेवाभावी उपक्रम राबवीत असल्याचे गौरवोद्गार त्यांनी व्यक्त केले आहे .

# रामदास राऊत यांचा नाभिक समाजाच्या वतीने सन्मान

राष्ट्रवादीच्या सांस्कृतीक विभागाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी निवड



**सुपा : प्रतिनिधी**

**रामदास राऊत यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या चित्रपट, कला व सांस्कृतीक विभागाच्या पुणे जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाल्याबददल नगर, पारनेर व शिरूर येथील नाभिक समाजाच्या असंख्य कार्यकर्त्यांच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.**

यावेळी बाळासाहेब भुजबळ, भाऊ बीडे, अनिल निकम, संतोष घायतडक, मच्छिंद्र घायतडक, शामराव जाधव, सुनील आतकर, प्रसाद भोसले, संजय वाकचौरे, नवनाथ राऊत, आदीनाथ बांगर, कृष्णकांत राउत, गणेश वाघमारे आदी उपस्थित होते.

यावेळी भाऊसाहेब बीडे यांनी रामदास राऊत यांनी पिंपळनेर येथील संत सेना महाराज ट्रस्ट या संस्थेला आहुजा कंपनीचा लाऊड स्पिकर सेट भेट दिल्याची आठवण करून दिली. संत सेना महाराज मंदिराचे वॉल कंपाउंड पुर्ण झाल्यानंतर लोखंडी गेट देण्याची ग्वाही देखील त्यांनी दिली आहे. समाजाच्या जडणघडणीत राऊत यांचा मोठा वाटा असून त्यांचे सहकार्य समाजासाठी नेहमीच राहील असा विश्वास बीडे यांनी व्यक्त केला. प्रसाद भोसले यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन तर नवनाथ राऊत यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# निघोजच्या विद्यार्थ्यांचे गोव्यातील स्पर्धेत मोठे यश

लोकनेते नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने सत्कार

**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज येथील प्रोफेशनल तायक्वांडो अ‍ॅकेडमीच्या विद्यार्थ्यांनी गोव्यातील इंटरनॅशनल स्पर्धेत कराटेसाठी मोठे यश मिळवले असून या विद्यार्थ्यांचा लोकनेते नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने सत्कार करण्यात आला.**



प्रतिष्ठानचे पदाधिकारी शिवाजीराव लंके मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त अनिल शेटे, ग्रामपंचायत सदस्या रुपाली गायखे, शिवबा संघटनेचे मुख्य पदाधिकारी राजूशेठ लाळगे, विशाल खराडे, राजू गायखे, पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे, पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे, उपाध्यक्ष व उपकार्याध्यक्ष भास्करराव कवाद, आपला गणपती समाजसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष रवि रणसिंग आदिंच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

गोवा येथील पेडम स्टेडियमवर झालेल्या या स्पर्धेत या विद्यार्थ्यांना १ गोल्ड, ४ सिल्हर, १ ब्राँझ अशाप्रकारे पदक मिळाले आहेत. या विद्यार्थ्यांना विक्रांत रणसिंग व ओमकार रणसिंग यांचे मार्गदर्शन मिळाले आहे. यावेळी राजनंदिनी राजेंद्र गायखे ( गोल्ड मेडल )राजेंद्र गायखे, पुनम गायखे, काव्या योगेश कवाद ( सिल्हर मेडल ) , योगेश कवाद, नंदीनी कवाद, प्रितेश कानिफनाथ कवाद ( सिल्व्हर मेडल ) कानिफनाथ कवाद, छाया कवाद, सिद्धार्थ विकास सोनवणे ( सिल्व्हर मेडल) विकास सोनवणे, सम्यक संतोष लोखंडे (सिल्व्हर मेडल) संतोष लोखंडे, प्रगती सुभाष ढसाळ ( ब्राँझ मेडल) सुभाष ढसाळ, अनिता ढसाळ, विकर्ण विलास निघोजकर व परवेझ सुलतान तांबोळी यांना पुणे येथील जिल्हास्तरीय स्पर्धेत ब्राँझ मेडल मिळाले. विलास निघोजकर, शितल निघोजकर, सुलतान तांबोळी अशाप्रकारे हे खेळाडू व त्यांचे आई वडील यांचा सत्कार आपला गणपती समाजसेवा प्रतिष्ठान, कराटे प्रक्षीक्षण केंद्र, पत्रकार संघ, लोकनेते नीलेश लंके प्रतिष्ठान व शिवबा संघटना, युवा सेना पारनेर तालुका आदी संघटनेच्या वतीने पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आला.

लोकनेते नीलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी शिवाजीराव लंके यावेळी म्हणाले आजच्या युगात विद्यार्थ्यांनी कराटेचे शिक्षण घेण्याची खऱ्या अर्थाने गरज असून विषेश करून मुलींनी स्वतः रक्षणासाठी हे प्रशिक्षण घेऊन स्वतः संरक्षण करणे गरजेचे आहे. रणसिंग बंधूंनी कराटे शिक्षणाच्या माध्यमातून एक चांगला उपक्रम सुरू केला असून यासाठी खासदार नीलेश लंके तसेच लोकनेते निलेश लंके प्रतिष्ठान माध्यमातून सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली आहे. मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त, शिवबा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष, युवा सेना तालुका प्रमुख अनिल शेटे यांनी या रणसिंग बंधूंचे कौतुक केले निघोजसारख्या मोठ्या लोकवस्तीच्या गावात कराटे प्रशिक्षण सुरू करुण रणसिंग बंधूनी एक सामाजिक भाव जोपासला असून या ठिकाणी विद्यार्थी संख्या कमी असली तरी भविष्यात मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळेल. जिल्हा, राज्य स्तरीय तसेच इंटरनॅशनल स्पर्धेत विद्यार्थी घेऊन जाणे एवढे सोपे नाही मात्र यासाठी आपण संघटनेच्या माध्यमातून सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली . ग्रामपंचायत सदस्या रुपाली गायखे यांनी यावेळी सांगितले गेली दहा वर्षांपासून रणसिंग बंधू छत्रपती शिवाजी महाराज जयंती असो की संभाजी महाराज जयंती या मिरवणुकीत विद्यार्थी कसब दाखवून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मावळ्यांचा लढाईचा प्रताप प्रत्यक्षात कृतीतून दाखवीत फार मोठा ऐतिहासिक ठेवा हा संदेश लोकांना देत असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ओमकार रणसिंग, विक्रांत रणसिंग यांनी केले शेवटी आपला गणपती समाजसेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष रवि रणसिंग यांनी आभार मानले.

# ऐक्य सेंटर व कमिन्सच्या माध्यमातून वर्गखोल्या

भोयरे गांगर्डाच्या शाळेचे रूपडे पालटणार

**भोयरे गांगर्डा : प्रतिनिधी**

**ऐक्य सेवा सेंटर व कमिन्स इंडिया प्रा. लि. यांच्या माध्यमातून भोयरे गांगर्डा जिल्हा परिषदेच्या शाळचे रूपडे पालटणार आहे. चार वर्गखोल्यांचे भुमीपुजन करून या कामास प्रारंभ झाला असून लोकसहभाग तसेच ऐक्य व कमिन्सच्या माध्यमातून गावामध्ये इतर उपक्रमही हाती घेण्यात येणार आहे.**

ऐक्य सेवा सेंटरचे तुकाराम वाखारे तसेच विद्यार्थी, सरपंच यांच्या हस्ते भुमिपुजन पार पडले. यावेळी नीलेश लंके प्रतिष्ठाणचे जिल्हाध्यक्ष कारभारी पोटघन हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. रामचंद्र थोरात, सरपंच शिवाजी शिंदे, विकास शिंदे यांच्यासह गावच्या सरपंच रोहिणी भोगाडे, युवराज डोंगरे, रविंद्र भोगाडे, व ग्रामस्थ, आजी माजी पदाधिकारी, शिक्षक उपस्थित होते. मा. सरपंच भाउसाहेब भोगाडे यांनी प्रास्ताविक केले. शिवाजी रसाळ यांनी सुत्रसंचलन, प्राचार्य सुभाष रसाळ यांनी आभार माणले.

ऐक्य सेवा सेंटरच्या माध्यमातून विविध ठिकाणी सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असून भोयरे गांगर्डा येथेही असे उपक्रम राबविण्यात यावेत यासाठी ग्रामस्थांच्या वतीने वर्षभरापासून पाठपुरावा करण्यात येत होता. या कामांमध्ये लोकसहभाग आवष्यक असल्याने सर्व बाबींची पडताळणी करून भोयरे गांगर्डाची निवड करण्यात आली. ऐक्य व कमिन्सच्या माध्यमातून तीन वर्गखोल्या बांधण्यात येणार असून लोकसहभागातून एक खोली बांधण्यात येईल. पुढील वर्षी ऐक्य व कमिन्सच्या वतीने आणखी तीन खोल्यांसाठी निधी देण्यात येईल तर एक खोली पुन्हा लोकसहभागातून बांधण्यात येईल. पुढील वर्षी पहिल्या चार खोल्यांवर मजला चढविण्यात येणार आहे.



### चिंचबनाची निर्मिती करणार

ऐक्य सेंटर व कमिन्सने हाती घेतलेल्या उपक्रमास साजेसा उपक्रम ग्रामस्थ हाती घेणार असून अर्धा ते एक एकरामध्ये ग्रामस्थ लोकसहभागातून चिंचबनाची निर्मीती करणार आहेत.

### वस्तीसाठी आर ओ प्लांट

गावामध्ये पाणी योजना असली तरी गावापासून दुर असलेल्या वस्तीसाठी ऐक्य सेंटर व कमिन्सच्या वतीने आर ओ प्लांट बसविण्यात येणार आहे. जेणेकरून तेथील ग्रामस्थांना शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध होऊ शकेल.

### आदर्श निर्माण करणार

ऐक्य सेवा सेंटर व कमिन्सच्या माध्यमातून आम्ही विविध उपक्रम हाती घेतले आहेत. खासदार नीलेश लंके यांच्या माध्यमातून गावात विविध योजना राबविण्याचे नियोजन करण्यात आले असून कामांच्या माध्यमातून आदर्श निर्माण करण्याचा आमचा मानस आहे.

दौलत गांगड
मा. उपसरपंच

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com